# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.६२३ दिनांक ०३.०८.२०२०

## घोलवड पोलीस ठाणे यांचेकडुन तबांकुजन्य अन्नपदार्थांची वाहतुक करणा-या आरोपीतांवर कारवाई

दिनांक ०२/०८/२०२० रोजी १४-३० वाजता घोलवड पोलीस ठाणे हद्दीतील झाई कोस्टल चेक पोस्ट येथे ता.तलासरी जि.पालघर येथे आरोपीत १) आंनद चंद्रकांत गुप्ता वय २४ वर्षे रा. बोईसर ता.जि.पालघर, २) मुकेश उलगप्पा कुशालकर वय २५ वर्षे रा. बोईसर ता.जि.पालघर यांनी आपल्या ताब्यातील होन्डा ॲक्टीया मोटार सायकल वर दोन सुथळी गोणी, मातेरी रंगाची कापडी बॅग व मातेरी निळी रंगाची पिशवीमध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला तबांखुजन्य अन्नपदार्थ ,विमल पान मसाला, मिराज, गोल्ड स्टेज सिगारेट रजनीगंधा सुगंधीत तंबाखु असा माल वाहतुक करीत असतांना मिळून आला आहे. आरोपीत यांचे ताब्यातुन १) १२,४८०/- रुपये किंमतीचे केसर युक्त विमल पान मसाला हिरव्या रंगाचे १०४ पॉकेट २) ३,१२०/- रुपये किंमतीचे वि-१ तंबाखु जांभळया रंगाचे १०४ पॉकेट ३) १३,०६८/- रुपये किमतीचे केसर युक्त विमल पान मसाला लाल रंगाचे ६६ पॉकेट ४) १,४५२/- रुपये किंमतीचे वि-१ तंबाखु लाल रंगाचे ६६ पॉकेट ५) १,८९०/- रुपये किमतीची तुलसी तंबाखुचे ५ बॉक्स ६) ७,७७६/- रुपये किमतीची रजिनीगंधा सुगंधीत तंबाखु ८ बॉक्स ७) १०००/- रुपये किंमतीची मिराज सुगंधीत तंबाखुचे ५ बॉक्स ८) २०००/- रुपये किमतीची गोल्ड स्टेग सिगारेटचे २ बॉक्स ९) ४५,०००- रु.किमतीची ग्रे मॅट रंगाची होन्डा ॲक्टीया मोटार सायकल नं. एम.एच.४८.बी.पी.६३१९ जु.वा.कि.सु असा एकुण ८७,७८६/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द घोलवड पोलीस ठाणे गु.र.नं. I ६९/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२८,,२७२, २७३,१८८,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक ०२/०८/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई सहायक पोलीस निरीक्षक श्री.प्रकाश सोनवणे, प्रभारी अधिकारी घोलवड पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली घोलवड पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner